मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३२१ वा ● बुधवार, ता. ४ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



### एसटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदवार्ता

## महागाई भत्त्यात वाढ; विमा आणि वैद्यकीय सुविधा जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वपूर्ण घोषणा करत दिलासा दिला आहे. जून २०२५ पासून एसटी कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर ४६ टक्क्यांऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येणार आहे. ही घोषणा त्यांनी एसटीच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत केली. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत यांच्यासह इतर अधिकारी आणि कर्मचारी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपमुख्यमंत्र्यांनी पुढील सवलतींचीही घोषणा केली: महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक योजना कर्मचाऱ्यांना निवडण्याचा पर्याय उपलब्ध. १ कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याचा निर्णय. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी मोफत प्रवास पास १२ महिन्यांसाठी लागू. या घोषणेमुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, अनेकांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

## पुणे ॲग्री हॅकॅथॉनचा यशस्वी समारोप

### मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची उपस्थिती



**पुणे । प्रतिनिधी**

बदलत्या हवामान आणि नव्या आव्हानांपुढे उभ्या असलेल्या कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे सक्षम करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'पहिल्या पुणे ॲग्री हॅकॅथॉन'चा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, तसेच कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात कृषी क्षेत्रातील समस्यांवर बोलताना सांगितले की, ''शेतीच्या टिकावासाठी व शेतकऱ्याला नवे पर्याय देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा काळाची गरज आहे. हॅकॅथॉनमध्ये विकसित झालेल्या तंत्रज्ञानाचे योग्य प्रकारे इन्क्युबेशन होणे आणि त्याचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.'' ते पुढे म्हणाले की, ''देशाच्या फलोत्पादन निर्यातीत महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. केंद्र सरकारच्या 'क्लिन प्लांट इनिशिएटीव्ह' अंतर्गत महाराष्ट्रात अधिक केंद्रे सुरू झाली पाहिजेत. बदलत्या हवामानाचा विचार करता ही केंद्रे शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतील.'' या उपक्रमामुळे कृषी क्षेत्रातील नवकल्पनांना चालना मिळेल, आणि नव्या पिढीतील स्टार्टअप्ससाठी कृषी विकासाचे दार खुले होईल, असा विश्वास सर्वच मान्यवरांनी व्यक्त केला.

## ना.धों. महानोर पुरस्कारासाठी शिफारशी पाठविण्याचे आवाहन



**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

शेती-पाणी आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा ''कविवर्य ना.धों. महानोर साहित्य, शेती-पाणी पुरस्कार'' यंदा दुसऱ्या वर्षी प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे आयोजन यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई आणि भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. या पुरस्कारांची घोषणा चव्हाण सेंटरचे अध्यक्ष मा. शरद पवार यांनी पूर्वीच केली होती. सन २०२५ साठी खालील क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या शिफारशी मागविण्यात आल्या आहेत : १. शेती व पाणी व्यवस्थापन - २ शेतकरी (महिला/पुरुष) २. मराठी साहित्य - ३ कवी आणि १ कादंबरीकार पुरस्कारासाठी शिफारस करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात : पारंपरिक व आधुनिक शेतीपद्धतींचा समन्वय साधणारे, पर्यावरणपूरक, नाविन्यपूर्ण आणि प्रयोगशील कार्य करणारे शेतकरी या पुरस्कारासाठी पात्र ठरतील.

१ सप्टेंबर २०२५ रोजी वय ४५ वर्षांखालील नव्या पिढीतील शेतकरी, लेखक आणि कवी यांचा विचार करण्यात येईल. साहित्य क्षेत्रातील पुरस्कार विशिष्ट पुस्तकासाठी नसून लेखक-कवींच्या संपूर्ण साहित्यिक योगदानावर आधारित असेल. मानवी मूल्यांना अधोरेखित करणारे आणि कोणत्याही प्रकारची विषमता न मानणारे साहित्यलेखन करणाऱ्या कवी-लेखकांच्या शिफारशीच ग्राह्य धरल्या जातील.शिफारस करताना संबंधित व्यक्तीच्या कार्याचे स्वरूप, वैशिष्ट्ये, तसेच साहित्याचे किंवा शेतीविषयक कार्याचे तपशील स्पष्टपणे नमूद करावेत. शिफारशी पाठविण्याची अंतिम तारीख : ३० जून २०२५ शिफारशी खालील मार्गांनी पाठवाव्यात : Google Form लिंक https:// forms. gle/Krzr VBuqirJBnxPA6 ईमेल admin@ chavancentre.org, WhatsApp : ९१ ८१६९४९३१६१ या पुरस्कारांचे वितरण मा. शरदराव पवार यांच्या हस्ते १७ सप्टेंबर २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे होणाऱ्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. हा पुरस्कार नव्या पिढीतील प्रतिभावान कार्यकर्ते व साहित्यिकांना प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास यशवंतराव चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे आणि जैन फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी व्यक्त केला आहे.

## अहिल्यानगरमध्ये ESIC रूग्णालयासाठी जमीन मंजूर

### कामगार संघटना महासंघाच्या मागणीला यश

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथे राज्य कामगार विमा योजनेच्या (ESIC) रूग्णालयासाठी तब्बल १५ एकर शासकीय जमिनीला मंजुरी देण्यात आली आहे. यासह अहिल्यानगर, बिबवेवाडी, बारामती, सांगली, अमरावती, बल्लारपूर, सिन्नर, सातारा व पनवेल येथील प्रस्तावित रूग्णालयांसाठीही शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास मंत्रीमंडळ बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या जवळच्या ठिकाणीच उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील कामगारांसाठी हा निर्णय अत्यंत दिलासादायक ठरणार आहे. अहमदनगरमधील कामगार संघटना महासंघाने कामगार हॉस्पिटलची मागणी २०१६ पासून सातत्याने केली होती. त्यासाठी मोर्चा, आंदोलने, निवेदन तसेच विविध मार्गाने जोरदार मागणी केली होती, त्यामुळे जागेबाबत थोडे यश आले, पण आता लवकरच सरकारने कामगार हॉस्पिटल सुरू करण्याबाबतची पुढील कार्यवाही सुरू करावी, अशी प्रतिक्रिया सिटूचे जिल्हाध्यक्ष कॉ.महेबुब सय्यद, महादेव पालवे, लहू लोणकर, आयटकचे कॉ. रामदास वागस्कर, दिपक शिरसाठ, बाळासाहेब सागडे, सतीश निमसे आदींनी यांनी दिली.

## आमदारांच्या मनातला नगराध्यक्ष व नगरसेवक कोण? नव्या चेहऱ्यांना प्राधान्याचे संकेत



**पाथर्डी । प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये युवकांना प्राधान्य देत उमेदवारीबाबत विचार होईल, असे वाक्य आमदार मोनिका राजळे यांनी भाषणातून उच्चारताच कार्यक्रमासाठी जमलेल्या व मंचावर बसलेल्या अनेक इच्छुकांचे चेहरे निस्तेज झाले. आपले काय होणार याची, चिंता इच्छुक लपवू शकले नाहीत. काल सकाळी जुना खेर्डा रस्ता येथे विविध विकासकामांचा भूमिपूजन समारंभ आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, नंदकुमार शेळके, अभय आव्हाड, बंडू बोरुडे यासह प्रेक्षकांमध्ये बसलेल्यांपैकी अनेक कार्यकर्ते आमदारांनी आपल्या उपस्थितीची दखल घ्यावी, अशा पद्धतीने लक्षवेधी जागेवर बसलेही. नेहमीच्या खूबीप्रमाणे आमदारांनी उपस्थितांची भली मोठी यादी वाचून दाखवत सगळ्यांच्या उपस्थितीची दखलही घेतली. आमदारांनी भाषणातून आपले नाव घेतले याची एरवी चेहऱ्यावर उमटणारी मोठेपणाची पुसटशी रेषा आज मात्र उमेदवारीच्या काळजीने प्रयत्न करूनही उमटली नाही. काही प्रभागातील चर्चेतील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाकडे पाठ फिरविली, त्याला पर्यायी उमेदवार तेथे उपस्थित अनेकांनी अशा इच्छुकाच्या भावनेची कदर करत त्याला शुभेच्छाही दिल्या. तरीही हसून दाद देण्याऐवजी इच्छुकाने आपला हेतू गुप्त ठेवण्यातच धान्यता मानली. कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित असलेले भाजपचे तालुकाध्यक्ष धनंजय बडे, महिला आघाडीच्या शहराध्यक्ष ज्योति शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष लांडगे, ज्येष्ठ नेते अशोक चोरमले यांनासुद्धा आमदारांच्या सूचक इशाऱ्याबाबत चिंतन करण्याची वेळ आली. यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या, कोट्यावधी रुपयांची विकासकामे पालिकाहद्दीत पूर्ण झाली आहेत. काही प्रगतीपथावर आहेत. तर काही कामांना आणखी निधी मिळणार आहे. पुढील महिन्यांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे व पालिकेला आर्थिक मदत व सहकार्य करणाऱ्या संबंधित मंत्र्यांच्या उपस्थितीत विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. जायकवाडीच्या नवीन पाणी योजनेची ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. वॉटर ट्रीटमेंट प्लांट प्रगतीपथावर असून भुयारी गटार व नव्या पाणी योजनेमुळे शहराच्या रस्त्यांची झालेली वाताहात व पाणीपुरवठ्यामध्ये झालेला विस्कळीतपणा ज्याबद्दल अधिकारी व पदाधिकाऱ्यांना कडून शहरवासीयांची दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे. आता पालिकेने साथरोगाच्या पार्श्वभूमीवर शहराची स्वच्छता, नालेसफाई, प्रभावीपणे करून पिण्याच्या पाण्याचे नियोजन काटेकोर करावे. मुख्याधिकाऱ्यांनी वैयक्तिक पातळीवर या कामांना प्राधान्य द्यावे. येणाऱ्या काळात सहा कोटींच्या सिमेंट बंधाऱ्याला मंजुरी मिळणार असून तालुका क्रीडासंकुल शहरालगत असलेल्या निवडुंगा हद्दीमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे. येत्या पाच वर्षात तेथे संकुल उभारण्याचा प्रयत्न केला जाईल. सोलर प्लांट, पाणी शुद्धीकरण यंत्रणा याबरोबरच लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्याचे कामही अंतिम टप्प्यात आहे. अशा सर्व कामांसाठी शासन व वरिष्ठ नेत्यांचे सहकार्य लाभले. मान्सून तोंडावर असल्याने विकासकामांचा वेग संबंधित यंत्रणांनी वाढवावा. कामे दर्जेदार करावीत. शहरातील सर्वच रस्ते पुन्हा नव्याने होणार आहेत. काही दिवस गैरसोय होईल, मात्र नव्या पद्धतीने होणारी कामे शहराच्या सौंदर्यात भर घालणारी ठरतील. लोकांच्या तक्रारीला वाव मिळणार नाही, याकडे पालिका प्रशासनाने लक्ष दिले जावे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने पालिका निवडणुकीबाबत शासन व प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. पक्षाची आगामी वाटचाल व उद्दिष्ट्ये बघता युवकांना प्राधान्याने उमेदवारीमध्ये सामावून घ्यावे, असे संकेत मिळत आहेत. लवकरच याबाबत अंतिम धोरण जाहीर होईल. कार्यकर्त्यांचे योगदान व निष्ठा पक्षाकडून बघितल्या जातात. कोट्यावधींची कामे होऊनही विधानसभा निवडणुकीत मते कमी कशी झाली याचे चिंतन कार्यकर्त्यांनी करावे. आपणही करीत आहोत. असे राजळे म्हणाल्या.दरम्यान, पालिका निवडणुकीबाबत प्रशासकीय हालचाली सुरू होऊन प्रभाग रचना, मतदार याद्या अशी कामे सुरू करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवल्यानंतर ती जाहीर करण्यात येतील. भाजपकडे अनेक इच्छुकांची गर्दी असून पुढील सर्व निवडणुकांचा विचार करता नव्या, निष्ठावान व सक्षम उमेदवाराला पुढे करत त्याला ताकद देण्याच्या मनस्थितीत आमदार राजळे असल्याने त्यांच्या अंतर्गत वर्तुळातील कार्यकर्त्यांसह पालिकेच्या माजी पदाधिकाऱ्यांना आमदारांच्या मनातला अध्यक्ष व नगरसेवक कोण याचा अंदाज लागत नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.मृत्युंजय गर्जे, सूत्रसंचालन सचिन वायकर तर आभार सोमनाथ बोरुडे यांनी मानले.

## डॉ. किशोर पाटील यांना राष्ट्रीय पत्रकार सन्मानरत्न पुरस्कार

**भिवंडी । गुरुदत्त वाकदेकर**




हिंदी पत्रकार दिनाचे औचित्य साधून हिंदभूमी टाइम्सचे संपादक तथा समाजसेवक यूसुफ मन्सूरी यांच्या वतीने २०२४ मध्ये विविध सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार भिवंडी येथील धामणकर नाका येथील सिटी सेंटर मॉलमध्ये करण्यात आला. या कार्यक्रमात ठाणे जिल्ह्यातील अग्रगण्य दैनिक स्वराज्य तोरणचे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील यांना ''राष्ट्रीय पत्रकार सन्मान रत्न पुरस्कार २०२४'' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार हिंदभूमी टाइम्सचे संपादक तथा समाजसेवक यूसुफ मन्सूरी यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शहरातील सामाजिक कार्य करणाऱ्या डॉक्टर, पोलीस, पत्रकार, शिक्षक, वकील व इतर मान्यवरांना सन्मानित करून त्यांच्या कार्याचा गौरव करणे, तसेच समाजात सकारात्मक कार्याची प्रेरणा प्रसारित करणे हा होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा भिवंडी युवा मोर्चा अध्यक्ष राजू चौघुले, माजी नगरसेवक वसीम अंसारी, समाजसेवक अकरम मन्सूरी, पोलीस उपनिरीक्षक अनंता वाघ, वकील खदीजा खान (मुंबई उच्च न्यायालय), मुख्याध्यापिका माहेनूर खान यांची उपस्थिती लाभली होती. तसेच पत्रकार क्षेत्रातील डॉ. किशोर बळीराम पाटील (संपादक, दै. स्वराज्य तोरण), फिरोज मेमन, अमृत शर्मा, आचार्य सुरजपाल यादव, संदीप गुप्ता, सोहेल अंसारी, सय्यद नकी हसन यांनीही आपली उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार यूसुफ मन्सूरी यांनी केले होते, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सज्जाद अख्तर यांनी केले. हा कार्यक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला, अशी प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# खुद्द मनपाच मारतेय नालेसफाईच्या फेका

### ▮ बड्याधेंडांची अतिक्रमणे जैसे थे ठेवून नालेसफाईचा फार्स
### ▮ सोशल मिडीयावर दिली जातेय दिशाभूल करणारी माहिती




**अहमदनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिकेमधे लोकप्रतिनिधी नगरसेवक नसल्याने कोणाचाच कंट्रोल राहिलेला नाही. प्रशासकीय कारभाराचे काळेबेरे धंदे जोरात सुरू असल्याची अधिकारी, कर्मचारी चर्चा करत आहेत. प्रशासकीय काळात एकाही स्थायी समिती अथवा जनरल सभेचा अजेंडा शहरातील नागरिकांना वर्तमानपत्रात वाचायला मिळाला नाही, लोकांना विषयपत्रिकाच माहिती करून दिली गेली नाही. मुळात मनपा अधिनियमाप्रमाणे प्रत्येक सभेची विषयपत्रिका (अजेंडा) शहरातील स्थानिक अथवा दुसऱ्या वर्तमानपत्रात नागरिकांच्या माहितीसाठी सभेपुर्वी प्रसिध्द केली पाहिजे. जेणेकरून तिथे कोणत्या विषयांचे निर्णय होणार आहेत हे जनतेला समजेल. घेतले जाणारे निर्णय चुकीचे असतील, शहराच्या अहिताचे, आर्थिक नुकसानीचे असेल तर त्यावर लोकांना हरकती घेता येतात. पण आजपर्यंत एकाही सभेची विषयपत्रिका लोकांना माहिती नाही. माजी नगरसेवकसुध्दा प्रशासकिय काळात काय विषय मंजूर झाले त्यावर काय कार्यवाही झाली हे अनभिज्ञ आहे. शहरातील लोकांनी मनपा प्रशासनाला हा जाब विचारला पाहिजे. येथून पुढे सभेच्या सर्व विषयपत्रिका (अजेंडा) स्थानिक वर्तमानपत्रात आठ दिवस आधी जनहितार्थ प्रसिद्ध केल्या पाहिजे. लोकांना मनपात काय चालले हे समजले पाहिजे.

काल ता.३ जून रोजी महानगरपालिकेच्या AMC Nagar या फेसबुकपेजवर अंदाजे ०६:३० वाजता एक व्हिडीओ पोस्ट प्रसिद्ध करण्यात आली. ती अशी - ''नालेसफाई ही केवळ प्रक्रिया नाही, ती शहराच्या भविष्यासाठीची बांधिलकी आहे! '' नाल्याची सुरुवात: मंगल हौसिंग सोसायटी नाल्याचा शेवट: पंपिंग स्टेशन नालेसफाईचे ठिकाण: रासने नगर

मुळात हा व्हिडीओ शहरातील लोकांची दिशाभुल करणारा आहे. मंगल हौसिंग सोसायटी ते पंपिंग स्टेशन व्हाया कुष्ठधाम रासनेनगर या नाल्यावर आजही अनेक ठिकाणी अतिक्रमणे आहेत. ती तशीच ठेवून नालेसफाईचा फार्स सुरू असल्याचे चित्र स्पष्ट दिसते. कुष्ठधामजवळ हा नैसर्गिक वाहता नाला अक्षरशः बेपत्ता केला गेला आहे. खुद्द या नाल्यावर भारतभारती देशप्रेमी संघटेत काम करत असलेल्या एका बिल्डरने फार वर्षांपुर्वी आकाश आणि या नावाच्या मोठ्या अपार्टमेंट बांधून नैसर्गिक वाहत्या नाल्याची चौकोनी सिमेंट गटार केली. हे अपार्टमेंटचे नाल्यावरील अतिक्रमण मनपा प्रशासकाने काढून नालेसफाई केली पाहिजे. याच नाल्यामधे कैलास कॉलनीजवळ एका घराचे अतिक्रमण व्हिडिओत स्पष्ट दिसत आहे. ते मनपा प्रशासकाने काढून नालेसफाई केली पाहिजे. याच पंचशिल हॉटेलजवळील कैलास कॉलनी नाल्यामधे २०१७ साली काही भुखंडतस्करांनी मनपा फंडातील पैशातून मोठमोठे सिमेंटपाईप टाकून नैसर्गिक वाहता नाला बंद केला होता. आम्ही तो २०१७ ते २०१९ पाठपुरावा करून खुला केलेला आहे. महानगरपालिका प्रशासनाने ठरविले तर शहरातील सर्व नैसर्गिक वाहत्या ओढ्यानाल्यांवरील अतिक्रमणे काढले जावू शकते. त्यासाठी शहरासोबत ऋणानुबंध असलेला इमानदार खमका अधिकारी राज्यशासनाने महानगरपालिकेला दिला पाहिजे, लोकांनी सरकारकडे तशी मागणी केली पाहिजे.

# जीवनात सुख-समृद्धीसाठी प्रत्येकाचे योगदान पाहिजे- डॉ. कमर सुरुर

## गाता रहे मेरा दिल, स्वरछंद ग्रुप आणि मख़दूम सोसायटीतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**अहमदनगर । आबिद खान**

''समाजातील इतरांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी निर्माण व्हावी यासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे,'' असे प्रतिपादन मख़दूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या सहसचिव आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शायरा डॉ. कमर सुरुर यांनी केले. स्वरछंद ग्रुप, ''गाता रहे मेरा दिल'' ग्रुप आणि मख़दूम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने नगर शहरातील कर्तृत्ववान महिलांच्या सन्मानार्थ एक भव्य सोहळा सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना डॉ. कमर सुरुर म्हणाल्या, ''आज बहुतांश लोक स्वतःच्या सुखासाठी धडपडत असतात, मात्र समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांसाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्यांची संख्या फारच मर्यादित आहे. अशा महिलांचा गौरव केला जाणे ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे.'' या कार्यक्रमात अलका मुंदडा, रजनी मनोज भंडारी, राजश्री शितोळे, ॲड. मनिषा केळगंद्रे-शिंदे, शबाना शेख, भारती शेवते, भावना केदार, रेश्मा आठरे, जागृती ओबेरॉय, रचना काकडे-तौर, ॲड. स्वाती जाधव, सलोनी जाधव, रविना कांबळे या कर्तृत्ववान महिलांना सन्मानचिन्ह, पुस्तक आणि पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमात सुरेल गीतांची महफिलही रंगली होती. नगरच्या हौशी कलाकारांनी रसिक प्रेक्षकांना आपल्या सुरेल आवाजाने मंत्रमुग्ध केले. प्रत्येक सन्मान आणि गीतानंतर टाळ्यांच्या कडकडाटात उपस्थितांनी भरभरून दाद दिली.कार्यक्रमाला कॉ. स्मिता पानसरे, सुप्रसिद्ध सूफी गायक पवन नाईक, उर्जिता फाउंडेशनच्या संध्याताई मेढे, जागरूक नागरिक मंचाचे सुहास मुळे, रहमत सुलतान फाउंडेशनचे युनुसभाई तांबटकर, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संजय सपकाळ, संगीतप्रेमी अमृत मुथा, ॲड. रवींद्र शितोळे, जीवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, ॲड. संतोष गायकवाड, मुस्कान असोसिएशनचे शफकत सय्यद, राजकुमार गुरनानी, ॲड. अमीन धाराणी, शिल्पकार विकास कांबळे, सुनंदा तांबे, ॲड. गुलशन धाराणी, डीसीबी बँकेचे सुरज सय्यद, नागेबाबा मल्टीस्टेटचे कदम, संजय गाडे, सेलिंग किचनचे राहुल कुकरेजा आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपा माळी आणि विजय माळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन आबिद खान यांनी केले.या कार्यक्रमासाठी संध्याताई मेढे, राजकुमार गुरनानी आणि आबिद दुलेखान यांचे विशेष सहकार्य लाभले. नगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते आणि संगीतप्रेमी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.



# युवा मोर्चाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांचा सत्कार

## भाजपचे बळ वाढविण्यासाठी युवामोर्चा कटिबद्ध- लेंडकर



**अहमदनगर । राजू खरपुडे**

युवाशक्ती ही कोणत्याही राष्ट्राची ताकद असते आणि आपल्या नेतृत्वात युवामोर्चा एकत्र येऊन सामाजिक आणि राजकीय बदल घडवेल, याची आम्हाला खात्री आहे. आम्ही प्रत्येकाने आपले कर्तव्य निभावून, जनतेशी जवळीक साधून पक्षाला नवे शिखर गाठण्यात हातभार लावू. आपल्या नेतृत्वाखाली काम करण्यास अत्यंत उत्सुक आहोत.

आमचे पूर्ण मनोबल आणि ऊर्जा आपल्याला दिली जाईल. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाताना आपण सर्वजण एकत्रितपणे यशस्वी होऊ आणि भारतीय जनता पार्टीचे बळ वाढविण्यासाठी युवा मोर्चा कटिबद्ध आहे. असे प्रतिपादन ओंकार लेंडकर यांनी केले. भाजप युवामोर्चाच्या वतीने भाजपचे नवनिर्वाचित शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आकाश सोनवणे, ओंकार लेंडकर, अभिषेक वाकळे, बाबा सानप आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते म्हणाले की, युवाशक्ती हा आपल्या पक्षाचा आणि देशाचा खंबीर पाया आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन देशासाठी, शहरासाठी काम करणे आवश्यक आहे.

मी तुमच्या मेहनतीवर आणि उत्साहावर पूर्ण विश्वास ठेवतो. माझे आवाहन आहे की आपण सर्वांनी एकत्र येऊन, नव्या ऊर्जा आणि नव्या विचारांनी भाजपचा उद्देश साध्य करूया, असे ते म्हणाले. या कार्यक्रमादरम्यान भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आणि त्यांनी एकमताने नव्या जिल्हाध्यक्षाला शुभेच्छा दिल्या.

एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करताना त्यांनी आपल्या शहरातील जनतेच्या विकासासाठी व पक्षाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प केला.



# वाढदिवसाला फाटा देऊन अनुश्रीची शाळेला मदत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी (माध्यमिक विभाग) येथील इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या कु. अनुश्री दिगंबर गवळी हिचा वाढदिवस यावर्षी एका वेगळ्या व प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला.

इतर कुठलाही खर्च न करता, अनुश्रीच्या वडिल दिगंबर गवळी यांनी आपल्या कन्येच्या हस्ते मंडळाच्या सहकारनगर, सावेडी येथील नवीन समर्थ प्रशालेच्या बांधकामासाठी आर्थिक मदतीचा धनादेश संस्थेस दिला. अनुश्रीचा वाढदिवस एक वेगळा दृष्टिकोन घेऊन पुढे आला. फुगे, केक, गिफ्ट्स नकोत, तर शिक्षणाचा भक्कम पाया रचणाऱ्या शाळेच्या उभारणीत स्वतःचा सहभाग हवा, अशी प्रेरणा देणारा हा सकारात्मक उपक्रम ठरला. गवळी हे एमआयडीसीतील एसीई फिडस् येथे व्यवस्थापक (मॅनेजर) पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, अनुश्रीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आपण अशा शाळेच्या उभारणीत सहभाग घेतला आहे, जिथून शेकडो विद्यार्थी भविष्यात समाजसेवेसाठी सिद्ध होतील.

ही गोष्ट अनुश्रीला मोठेपणी अभिमान वाटावा अशा पिढी घडवणाऱ्या शाळेसाठी साजरा करण्यात आल्याचे, ते म्हणाले.

या स्तुत्य कार्याबद्दल गवळी यांचा किशोर देशपांडे (नवीन समर्थ प्रशालेचे बांधकाम प्रमुख, कार्यकारिणी सदस्य व शालेय समिती अध्यक्ष), व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर व प्राचार्या जोशी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पर्यवेक्षक सुनील कानडे, शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग उपस्थित होते. सर्वांनी अनुश्रीचे व तिच्या कुटुंबाचे अभिनंदन करत ही कृती ज्ञान मंदिर उभारणीला सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

# सप्तरंग : संस्थात्मक शिस्त आणि सांस्कृतिक बांधिलकीची प्रेरणादायी कहाणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

हौशी नाट्यसंस्थांच्या वाटचालीत आर्थिक अडचणी, कलावंतांचे मतभेद आणि तांत्रिक अडथळे यामध्येच बहुतेक संस्था क्षीण होत जातात. मात्र याच पार्श्वभूमीवर गेल्या ३९ वर्षांपासून ऐतिहासिक अहमदनगरमधील 'सप्तरंग थिएटर्स' या नाट्यसंस्थेने आपल्या शिस्तप्रिय धोरणांमुळे यशस्वी वाटचाल कायम ठेवली आहे. राज्यनाट्य स्पर्धेत मिळालेल्या रोख पारितोषिकाच्या संदर्भात कलाकार कल्पेश शिंदे आणि गायत्री रोहोकले यांचा उल्लेख संस्थापक अध्यक्ष डॉ. श्याम शिंदे यांनी विशेष कौतुकास्पद ठरवला. पारितोषिकाची रक्कम संस्थेकडे जमा करून त्यांनी नाट्य संस्थे विषयी असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली. सामान्यतः हौशी नाट्यसंस्था ही कलाकारांची हौस म्हणून ओळखली जाते. स्वतःहून वर्गणी गोळा करणे, खर्च स्वतः खिशातून उचलणे, आणि पारितोषिक मिळाले तर ते संस्थेत जमा करणे. ही एक रूढ पद्धत असते. मात्र 'सप्तरंग' ही संस्था या सर्व पारंपरिक चौकटींपेक्षा वेगळी आहे. दरवर्षी सुमारे अडीच ते तीन लाख रुपये खर्च करून विविध नाट्यप्रयोग आणि सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवले जातात, तेही कोणत्याही कलाकाराकडून शुल्क न आकारता! संस्थेच्या सुरुवातीच्या ३१ वर्षांत डॉ. श्याम शिंदे यांनी संपूर्ण जबाबदारी खांद्यावर घेतली. पुढील ८ वर्षांपासून ही संस्था प्रायोजक, देणगीदार आणि शासनाच्या मदतीने कार्यरत आहे. 'सप्तरंग'ने कधीही कोणत्याही कलाकाराकडून फी घेतलेली नाही, ही बाब आजही नाट्यविश्वात उदाहरण म्हणून पाहिली जाते. तथापि, संस्थेच्या शिस्तबद्ध नियमांना अनुसरून वागणाऱ्या कलाकारांप्रमाणेच क्वचितच काही अपवादही दिसून आले. काही कलाकार रोख पारितोषिक संस्थेकडे जमा करण्यात टाळाटाळ करतात, तर काहीजण सोशल मीडियावर खोट्या व अपमानास्पद प्रतिक्रिया देतात. मात्र 'सप्तरंग'चा पाया इतका मजबूत आहे की, अशा असंतुष्ट लोकांचा फारसा परिणाम संस्थेवर होत नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. शिंदे म्हणतात, ''माझ्याकडे प्रत्येक गैरसमजाविरुद्ध पुराव्यांसह उत्तर असते. गरज भासल्यास मी पोलिस, न्यायालय, प्रसारमाध्यमे आणि प्रशासन या संविधानिक मार्गांचा वापर करून संस्थेच्या प्रतिमेचे रक्षण करतो.'' 'सप्तरंग'च्या यशस्वी वाटचालीत कलारसिक प्रेक्षक, संस्थेचे स्पष्ट आर्थिक धोरण आणि नाटकाप्रती निष्ठा ही मुख्य त्रिसूत्री ठरली आहे. अखेर, ''नटेश्वराच्या कृपेसह 'सप्तरंग'ची ही सांस्कृतिक यात्रा अशीच अखंडपणे सुरु राहो,'' अशी भावना डॉ. श्याम शिंदे यांनी व्यक्त केली.

सप्तरंग थिएटर्स

# संत निरंकारी मिशनचे व्यापक वृक्षरोपणासह स्वच्छता अभियान

## देशभरातील १८ प्रमुख पर्वतीय व पर्यटन स्थळांचा समावेश

**अहमदनगर । प्रतिनिधी**

संयुक्त राष्ट्र संघाकडून दरवर्षी ५ जून रोजी 'विश्व पर्यावरण दिवस' आयोजित केला जातो. या वैश्विक पुढाकारातून प्रेरणा घेत सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या लोकमंगलकारी व दूरदर्शी नेतृत्वाखाली संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन संयुक्त राष्ट्राकडून निर्धारित थीम 'बीट प्लास्टिक सोल्युशन' ला केंद्रीभुतठेवत देशभरातील



१८ प्रमुख पर्वतीय पर्यटन स्थळावर गुरुवारी ता. ५ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत एक व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान आयोजित करीत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील महाबळेश्वर, पाचगणी, खंडाळा, लोणावळा, पन्हाळा व सोमेश्वर या ठिकाणी निरंकारी मिशनचे स्वयंसेवक, सेवादल सदस्य, भक्तगण व स्थानिक नागरिक मंगलकारी प्रार्थनेत सहभागी होऊन कार्यक्रमाची सुरुवात करतील.

याप्रसंगी युवा स्वयंसेवक प्लास्टिक प्रदूषणाचा दुष्परिणाम आणि त्यावरील उपाययोजना यावर जनजागृती करतील तसेच पर्यावरण संरक्षणाचे संदेश देणारे फलक व बॅनर हातात घेऊन मानवी साखळी तयार करून यावेळी समाजाला प्रेरणा दिली जाणार आहे. या विश्व पर्यावरण दिवस प्रसंगी संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचा हा एक समर्पित पर्याय एक सार्थक संदेश देत आहेत की सर्वांनी मिळून पर्यावरणाचे रक्षण करूया ज्या योगी भावी पिढ्यांसाठी एक स्वच्छ सुंदर आणि संतुलित पृथ्वी सजवली जाऊ शकेल.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# चाफा बोलेना... चाफा दिसेना...चाफा फिरकेना

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

**कुठलाही द्रवपदार्थ कायम समपातळीत राहतो, या भौतिकशास्त्रातील नियमाला राजकारणही अपवाद नाही. कोणत्याही नेत्याने पक्षांतर केलं म्हणून पक्ष संपत नाही. तात्पुरता खड्डा पडला तरी तो यथावकाश भरुन निघतो. परंतु एकदा गमावलेला विश्वास मात्र काही केल्या परत संपादन करता येत नाही, हेही तितकंच खरं आहे. याच अविश्वासामुळे ढाकणे यांच्या सार्वजनिक जीवनात कायमस्वरूपी कार्यकर्त्यांचा दुष्काळ आहे. तो आता काहीसा संपत नाही तोच पुन्हा एकदा ढाकणेंच्या पक्षांतराची चर्चा सुरू झाली आहे.**

गेल्या फेब्रुवारी महिन्यात, शहरातील संस्कार भवन येथे आयोजित केलेल्या आढावा बैठकीत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रताप ढाकणे म्हणाले होते की, एक एप्रिलपासून ते पुन्हा नव्या जोमाने कामाला सुरुवात करणार आहेत. परंतु, प्रत्यक्षात मात्र ते अजूनही सक्रिय झालेले दिसत नाहीत. त्यामुळे, त्यांनी लोकांना एप्रिल फूल केले होते की काय अशी शंका येऊ लागली आहे. कारण अजूनही त्यांनी त्यांच्या त्या विधानावर अंमलबजावणी केलेली नाही. गेल्या काही दिवसांपासून, प्रताप ढाकणे भाजपात जाणार असल्याची चर्चा आहे. एका प्रमुख वृत्तपत्रात तशा आशयाची बातमीही छापली गेली होती. ढाकणे यांनी त्या बातमीचं अद्यापही खंडन न केल्यामुळे त्यांच्याविषयीचा संभ्रम बळावला आहे. तसेच, कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविषयी मध्यप्रदेशातील भाजपाचे मंत्री विजय शहा यांनी काही दिवसांपूर्वी केलेलं वादग्रस्त वक्तव्य व हरियाणाची यूट्यूबर ज्योती मल्होत्रा हिने पाकिस्तानसाठी केलेल्या हेरगिरीच्या घटनेवरही प्रताप ढाकणे यांनी मत व्यक्त केलं नाही. विरोधकांना अडचणीत आणणाऱ्या या घटनांवर ढाकणेंनी मौन बाळगल्यामुळे त्यांच्याभोवती संशयाचे मळभ दाटले आहेत. कोंढाण्याचं लगीन झालं, आता रायबाच्या लग्नासाठी त्यांना वेळ हवा असून त्यांच्या घरात दोन-दोन रायबा असल्याचं सांगत ढाकणे यांनी त्यांच्या मुलांच्या लग्नांनंतर सक्रिय होणार असल्याचं ठामपणे सांगितलं होतं. परंतु अजूनही ढाकणे सार्वजनिक जीवनात सक्रिय झाले नाहीत. याउलट, त्यांच्या पारंपरिक राजकीय विरोधक आमदार मोनिका राजळे यांनी, शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात तिरंगा यात्रा काढून वातावरणनिर्मिती केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही महत्वाची राजकीय हालचाल असूनही ढाकणे अजून गप्पच आहेत. भाजपाचे राज्यसभेतील खासदार भागवत कराड यांचा कार्यकाळ संपत आला असून त्यांच्या जागी प्रताप ढाकणे यांची वर्णी लागणार असल्याची चर्चा शेवगाव व पाथर्डी तालुक्यांसह जिल्ह्यातही सुरू आहे. एका वजनदार महंतांच्या माध्यमातून त्यांनी तशी फिल्डींग लावल्याचंही बोललं जात आहे. विरोधकांना अडचणीत आणणाऱ्या घटनांवर ढाकणेंनी मौन बाळगल्यामुळे त्यांच्या भाजपप्रवेशाला दुजोरा मिळत आहे.



जर ढाकणेंनी पक्षांतर केलंच तर मात्र शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात मोठी राजकीय पोकळी निर्माण होणार आहे. अर्थात, अजून तरी या जर तरच्या गोष्टी आहेत. परंतु, असं झालंच तर त्यांच्यासोबत राहिलेल्या सर्व कार्यकर्त्यांची फरपट होणार, हे मात्र नक्की. जोपर्यंत ढाकणे या चर्चेचं खंडन करत नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर आरोप करणं संयुक्तिक ठरणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांची मात्र तोपर्यंत घुसमट होणार आहे. त्यामुळे, ढाकणेंना जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो त्यांनी लवकर घ्यावा, अशी काही कार्यकर्त्यांची भावना आहे. परंतु, ढाकणे मात्र काही बोलत नाहीत, दिसत नाहीत आणि इकडे फिरकतही नाहीत. त्यामुळे सध्या तरी कवी बी उर्फ नारायण मुरलीधर गुप्ते यांच्या चाफा या लोकप्रिय गीताच्या धर्तीवर चाफा बोलेना...चाफा दिसेना... चाफा फिरकेना या ओळी पाथर्डी तालुक्यात रुंजी घालत आहेत.

# आजपासून रंगणार देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार

## लाल मातीचे आखाडे सज्ज । तोडीस तोड मल्ल भिडणार

**शेवगाव । प्रतिनिधी**



येथील खंडोबानगर मैदानावर आजपासून देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार रंगणार आहे. अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धेच्या ठिकाणी दोन मातीचे आखाडे सज्ज करण्यात आले असून, प्रेक्षकांना बैठण्यासाठी गॅलरीची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे आणि जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे यांनी दिली. बुधवारी ता.४ जून सकाळ पासून कुस्तीपटूंचे वजन होणार आहे. तर सायंकाळी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज, राम महाराज झिंजुर्के व प्रशांत भालेराव यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. स्पर्धेची तयारी पूर्ण झाली असून, जिल्ह्यातून आलेल्या कुस्तीपटूंना राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अत्यंत नियोजनबध्दपणे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत लहान गटांपासून मोठ्या गटांपर्यंत एकूण ९ गटात मातीवर कुस्त्या होणार आहे. सर्व विजयी मल्लांसाठी भरघोस बक्षिसांचे नियोजन करण्यात आले आहे.



# झापवाडीमध्ये कृषीकन्यांचे शेतकऱ्यांनी केले उत्साहात स्वागत

**नेवासा । विजय खंडागळे**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषी महाविद्यालय, सोनईच्या अंतिम वर्षाच्या कृषी पदवीधर विद्यार्थिनींचे आगमन झापवाडी (ता. नेवासा) येथे झाल्याने गावात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव (RAWE) या कार्यक्रमांतर्गत कृषी कन्यांचे स्वागत ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले. गावचे सरपंच पांडुरंग वाघ, ग्रामसेवक अशोक गुढदे, यशवंत झरेकर, सुभाष जरे, नवनाथ जरे, साहेबराव वाघ, गोरक्षनाथ गायकवाड, शिवराम शिंदे, बाबासाहेब झरे, गोरक्षनाथ झरेकर तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत स्वागत समारंभ पार पडला. दहा आठवड्यांच्या कालावधीतील या कार्यक्रमादरम्यान कृषी कन्यांचा समूह आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पीक पाहणी, माती परीक्षण आदींबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहे.

या उपक्रमातून विद्यार्थिनी प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेणार असून, त्यांच्या समस्या, जीवनमान, आर्थिक स्तर, साक्षरतेचे प्रमाण, पिक पद्धती यांचा सखोल अभ्यास करणार आहेत. तसेच पाणी परीक्षण, रोग-किडींचे व्यवस्थापन, हवामान सल्ला, बाजारभाव, व आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती देण्यात येणार आहे. शेवटच्या चार आठवड्यांत कृषी औद्योगिक प्रशिक्षणात सहभागी होऊन विद्यार्थिनी कृषी आधारित व्यवसाय व उद्योगांमध्ये प्रत्यक्ष अनुभव घेणार आहेत. ग्रामीण तरुणांना कृषी क्षेत्रातील शासकीय योजनांची माहिती देणे हा या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. मोरे, उपप्राचार्य एस. व्ही. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. ए. ए. दरदंले, कार्यक्रम अधिकारी डॉ. एन. एन. विधाटे व इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

कार्यक्रमात सहभागी कृषी कन्या: हिवाळे दिप्ती, जाधव वैष्णवी, काळे जोती, हुंडारे विद्या, ननवरे सिध्दी या विद्यार्थिनी झापवाडी येथील शेतकऱ्यांना विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन करत आहेत.

# घरकुल प्रकल्पाला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तालुक्यातील वांगदरी ग्रामपंचायतीच्या महाआवास घरकुल प्रकल्पाला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दिला गेला.

या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, चंद्रकांत पाटील, जयकुमार गोरे, दत्तात्रेय भरणे, नीलम गोऱ्हे, योगेश कदम, माधुरी मिसाळ आदी उपस्थित होते. हा प्रकल्प सहकारमहर्षी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे व माजी जिल्हा परिषद सभापती अनुराधा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली उभारण्यात आला आहे. सरपंच संजय नागवडे, गटविकास अधिकारी राणी फराटे, विस्तार अधिकारी मोशीन मालजपते, ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण मुरकुटे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारण्यात आला. या प्रकल्पासाठी ग्रामपंचायतीने महाराष्ट्र शासनाची ४० गुंठे जागा मिळवून घेतली. प्रधानमंत्री आवास योजनेतून ३६ दर्जेदार स्लॅबयुक्त घरकुलांची निर्मिती करण्यात आली. यासाठी एकूण १ कोटी २२ लाख ५० हजार रुपयांचा खर्च झाला असून, यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा ८५ लाखांचा निधी, रेल फॉर फाउंडेशनचा २० लाखांचा निधी आणि उर्वरित खर्च राजेंद्र नागवडे व ग्रामपंचायतीच्या फंडातून करण्यात आला. या यशामागे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार बबनराव पाचपुते यांचे सहकार्य लाभले. सरपंच नागवडे यांनी हा पुरस्कार स्व. शिवाजीराव नागवडे बापूंना समर्पित केला असून, संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे.

# किशोर सोलट यांचे आरएसपी अधिकारी प्रशिक्षण पूर्ण

**जामखेड । रिजवान शेख**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, जवळा ता. जामखेड, जि. अहिल्यानगर येथील शिक्षक किशोर सोलट यांनी महाराष्ट्र शासनाच्या गृह विभाग, पोलीस विभाग आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण (RSP) अधिकारी प्रशिक्षण नुकतेच यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. हे प्रशिक्षण ता. २१ मे २०२५ ते ३० मे २०२५ या कालावधीत पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर येथे पार पडले.



प्रशिक्षणामध्ये महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल आणि नागरी संरक्षण संघटना, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पदसंचलन, वाहतूक नियंत्रण, नागरी संरक्षण, अग्निशमन सेवा, प्रथमोपचार व आकस्मिक सेवा यांसारख्या विविध क्षेत्रांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार शिक्षक सेवेत असतानाही अधिकारी म्हणून खाकी वर्दी परिधान करण्याची संधी सोलट यांना मिळाली, ही बाब अत्यंत गौरवाची आहे. या प्रशिक्षणात मुसा सय्यद, मेजर मोरे, मेजर दाभाडे, विभागीय समादेशक शेख, जिल्हा समादेशक बोंतले, जिल्हा उपसमादेशक प्रकाश मिंड, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब जोरे यांनी सांगितले की, आगामी शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना शिस्त, नियमबद्धता व स्वयंशिस्तीचे धडे विशेष तासिकांद्वारे दिले जाणार आहेत.किशोर सोलट यांनी हे कठीण प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल ग्रामस्थ, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा सल्लागार समिती, शालेय व्यवस्थापन व विकास समिती, माता-पालक संघ, पालक वर्ग आणि सर्व ग्रामस्थांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# हभप नामदेव तांबे वैकुंठवासी

**नेवासा । विजय खंडागळे**



महाराष्ट्रातील प्रसिध्द किर्तनकार हभप ज्ञानेश्वर महाराज तांबे राहणार जेऊर हैबती यांचे वडील कै. नामदेव माधव तांबे यांचे रविवार ता. १ जून २०२५ रोजी सकाळी ६ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे वय ८५ वर्ष होते. त्यांच्या निधनाने तांबे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या मागे १ मुलगा ४ मुली, ३ भाऊ, ३ पुतणे, १५ नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शिक्षकेतर भरतीला स्थगिती; कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी



**नेवासा । विजय खंडागळे**

राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेला पुन्हा एकदा सरकारकडून स्थगिती देण्यात आली आहे. सन २०२४-२५ च्या संच मान्यतेनंतरच समायोजनाचा आढावा घेऊन भरतीस परवानगी दिली जाणार असल्याचे स्पष्ट करणारे परिपत्रक नुकतेच शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी काढले. त्यामुळे नुकतीच जाहीर झालेली शिक्षकेतर भरती प्रक्रिया पुन्हा अनिश्चिततेत गेली आहे. राज्यात २००५ पासून लागू करण्यात आलेल्या अन्यायकारक आकृतीबंधामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर अन्याय सुरूच आहे. त्याविरोधात विविध संघटनांनी वेळो-वेळी आंदोलने, मोर्चे व न्यायालयीन लढाया केल्या. त्यानंतरही शासनाने वेळकाढूपणा करत विविध समित्या नेमून वेळ फुकट घालवला.

अखेर कोणताही अहवाल न घेता, शासनाने २८ जानेवारी २०१९ रोजी एकतर्फी आकृतीबंध लागू केला. या नव्या आकृतीबंधात शिपाई पदाची भरती कायमची बंद करण्यात आली. याच आकृतीबंधानुसार ४ एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णय घेऊन भरतीस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक आदी सुमारे ३०,००० पदांची भरती जाहीर करण्यात आली होती. परंतु, २८ मे २०२५ रोजी शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून ही भरती स्थगित केली. आता संच मान्यतेनंतर राज्यातील सर्व पदांचा आढावा घेऊनच भरती होईल, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. या निर्णयावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

''एकीकडे भरती जाहीर करायची आणि दुसरीकडे तीच भरती स्थगित करायची, हा कुठला प्रकार?'' असा सवाल महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघाचे महासचिव पाराजी मोरे यांनी केला आहे. गेली २० वर्षे शिक्षकेतर भरती बंद असल्यामुळे कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर घटली आहे. त्यामुळे अतिरिक्त कामाचा ताण शिक्षकांवर येतो आहे.

शासन शिक्षकांच्या जीवनाशी खेळ करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. २०१९ मध्ये जाहीर केलेल्या आकृतीबंधाची २०२५ पर्यंत अंमलबजावणी न होणं, हा शासनाच्या उदासीन धोरणाचा स्पष्ट पुरावा आहे. याचा समाजावर गंभीर परिणाम होत असून शासन मात्र गेंड्याच्या कातडीसारखे शांत आहे, अशी टीका संघटनेकडून करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघाची तातडीची कार्यकारणी बैठक बोलावण्यात येणार असून पुढील आंदोलनाची दिशा त्यात ठरवली जाईल. या आंदोलनाची पूर्ण जबाबदारी शासनावर राहील, असा इशारा महासंघाचे अध्यक्ष वाल्मीकराव सुरासे आणि महासचिव पाराजी मोरे यांनी दिला आहे.

# विनोदसम्राट पद्मश्री अशोक सराफ

मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७८ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७८ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना नुकतेच पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी नुकताच त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा अशोक मामा!!!





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# शिवराज्यभिषेक सोहळ्यातून ऐतिहासिक सत्याचा जागर- काळे

## ५ व ६ जूनला रायगडावर सहभागी होण्याचे संभाजी ब्रिगेडचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे बहुजनांची अस्मिता. राज्यासह देशाचा स्वाभिमान रयतेचा अभिमान. या राजांच्या शिवराज्यभिषेक सोहळ्यात उपस्थिती दर्शवून अभिवादन करू. या सोहळ्यातून त्यांच्या ऐतिहासिक सत्याचा जागर सर्वसामान्यांच्या मनामनात रुजवू असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतिश काळे यांनी केले. शिवराज्यभिषेक सोहळ्यासाठी रायगडावर दरवर्षी लाखो शिवप्रेमी आपली उपस्थिती असतात. यंदाच्या वर्षीही पाच आणि सहा जून रोजी रायगडावर भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला पिंपरी-चिंचवड शहरातून हजारो शिवप्रेमी घेऊन जाणार असल्याचा निर्धार काळे यांनी व्यक्त केला. तसेच सर्वांनी या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले. काळे यांनी सांगितले की, यंदाच्या वर्षी शिवराज्यभिषेक सोहळा जागर शौर्य भक्तीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पाच जून रोजी दुपारी साडे तीन ते रात्री साडे नऊ वाजेपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. तसेच सहा जून रोजी सकाळी सात ते दुपारी सव्वा बारा वाजेपर्यंत हा सोहळा होतो. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व बहुजनांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांना या सोहळ्याच्या निमित्ताने अभिवादन करून त्यांच्या जाज्वल्य इतिहासाला सतत स्मरणात ठेवणे आवश्यक आहे. बहुजनांमध्ये त्यांच्या कार्याची प्रचिती तेवत ठेवायला हवी. रयतेसाठी त्यांनी दिलेला लढा याचा प्रत्येकानेच अभिमान बाळगायला हवा, काही दुषित मनाच्या व्यक्ती शिवरायांचा इतिहास बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या या विद्रुप मनवृत्तीला छेद देण्यासाठी रायगडाच्या सोहळ्याचे साक्षीदार व्हा, सहभागी व्हा, असे आवाहन सतीश काळे यांनी केले.



# नेहरु मार्केटमधील ओटेधारक व गाळेधारकांचे पुनर्वसन करा- झिंजे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील नेहरु मार्केट भाजी विक्रेता संघटना अध्यक्ष तथा माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी मनपा प्रशासनाची भेट घेऊन मागणी केली आहे की, नेहरु मार्केटमधील ओटेधारक व गाळेधारकांचे पुनर्वसन करावे तसेच मनपाने मुळ रोजगाराचा हक्क असलेले गरीब विक्रेते यांच्यावर अन्याय करू नये. याबाबत प्रशासक तथा आयुक्त यांना मागणीपत्र दिले. त्यात म्हटले की, चितळेरोड येथील नेहरु मार्केटमधील भाजीविक्रेते व व्यावसायिक हे नेहरु मार्केट याठिकाणी जुने मार्केट अस्तित्वात असताना या इमारतीत व्यवसाय करीत होतो. हे सर्वजण नियमितपणे आजही टॅक्स भरीत आहेत. नेहरु मार्केट ही इमारत अंदाजे १४ वर्षांपूर्वी म.न.पा. मार्फत पाडण्यात आली. या वास्तुमध्ये जुने ओटेधारक व गाळेधारक तसेच ३ कराराने दिलेल्या जागा यांचे पुनर्वसन करण्याबाबत तात्कालिन नगरपालिका व महानगरपालिका जनरल बोर्डामध्ये पुनर्वसन करण्याबाबत वेळोवेळी ठराव करण्यात आले आहेत. तसेच कोर्टाकडे देखील याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे हे मुळ हक्कदार असून नेहरु मार्केटमध्ये पुर्वी व्यवसाय करणाऱ्या ओटेधारक व गाळेधारकांचे तसेच कराराने दिलेल्या जागा यांचे पुनर्वसन करण्यात यावे.तसेच या महत्वाच्या विषयावर तातडीने आयुक्तस्तरावर गाळेधारक, ओटेधारक, कराराने दिलेले जागेधारक व नेहरु मार्केट समितीचे अध्यक्ष व समितीचे पदाधिकारी यांची मिटींग घ्यावी, अशी मागणी माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी केली.दरम्यान सिटी सर्व्हे नं.२०८ मधील नेहरूमार्केट या ठिकाणी परगावच्या गांधी नामक बिल्डरसोबत विकसनाचे मनपा रिमोटकंट्रोलचे प्रयत्न असून शहरातील रहिवासी असलेल्या मुळ भाजीविक्रेते, गाळेधारक यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. शहरातील मुळ हक्कदारांचा रोजगार हिरावला जावू शकतो. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन व्हावे, यासाठी संघटना मनपा प्रशासकाकडे बैठकीची मागणी करत आहे.२००१ पासून इमारतीच्या खाजगीकरणाचे प्रयत्न सुरू होते. २०१६ पर्यंत तब्बेत ९ वेळेस खाजगीकरणासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली तर थेट १० व्या वेळेला तीन निविदा आल्या. त्यात ए.सी. कोठारी यांची निविदा २ कोटी ४१ लाख रुपयांची होती. मात्र, निविदेची प्रीमियम व्हॅल्युएशन योग्य नसल्याचे कारण देत, काही राजकीय पक्षांनी विरोध केला होता. आता पुन्हा या टाऊकच्या जागेकडे लक्ष असून काय काय उद्योग होतात हे शहरातील नागरिकांनी पाहणे महत्वाचे ठरणार आहे.





# सुट्टीत शिक्षकांना निवड, वेतनश्रेणीचे प्रशिक्षण

## जिल्हा परिषद शिक्षकांसाठी होणार ऑनलाइन परीक्षा

**दौंड । श्याम ठाणेदार**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या मार्फत २ जून ते १२ जून २०२५ च्या दरम्यान राज्यात एकाच वेळेस जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांसाठी निवडश्रेणी व वेतन श्रेणीचे प्रशिक्षण सुरू होणार आहे. शिक्षकांनी आपल्या सेवेची १२ वर्षे पूर्ण केल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणी तर २४ वर्षे पूर्ण केल्यानंतर निवड श्रेणीचा विशेष आर्थिक लाभ मिळतो. यापूर्वी प्रशासनामार्फत प्रशिक्षण काळातील निवास, भोजन, व प्रवास खर्च मोफत केला जात होता. मात्र या प्रशिक्षणासाठी ऑनलाइन लिंकद्वारे २००० रुपये भरून प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

शिक्षक सेवेत दाखल झाल्यापासूनची परिस्थिती व त्यानंतर झालेले स्थित्यंतरे याबाबत शिक्षकांना प्रशिक्षण मिळणार आहे. नुकतेच राज्यस्तरीय प्रशिक्षण पुणे येथे पार पडले. या प्रशिक्षणातील तज्ज्ञ मार्गदर्शक प्रत्येक तालुक्यातील शिक्षकांना वर्गात जावून ऑफलाइन स्वरुपात प्रशिक्षण देणार आहेत. पुणे जिल्ह्यात २४९३ प्रशिक्षणार्थींना आपल्या तालुक्यात हे प्रशिक्षण मिळणार आहे. राज्यस्तरावरून एकाच वेळी प्रशिक्षणार्थींची तासिकानिहाय उपस्थिती घेतली जाणार आहे. तसेच ऑनलाइन स्वरुपात मूल्यांकन देखील केले जाणार आहे. निवास, भोजन, प्रवास खर्च किंवा इतर कोणतीही तरतूद येथे उपलब्ध होणार नाही. यावर्षी हे प्रशिक्षण ऑफलाइन स्वरुपात प्रत्यक्ष वर्गात होणार असले तरी प्रत्यक्ष तासिका झाल्यावर निर्धारित वेळेत ऑनलाइन चाचणी सोडवावी लागणार आहे. परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळवणे आवश्यक असल्याने सदर प्रशिक्षण ऑनलाइन व ऑफलाइन अशा मिश्र स्वरुपात होणार आहे. यापूर्वी प्रशिक्षणार्थींना ठराविक मुदतीत आपल्या सोयीने प्रशिक्षण करता येत होते.

मात्र, यावेळी एकाचवेळी ऑनलाइन लिंकद्वारे संपूर्ण राज्यात एकाच वेळी चाचणी परीक्षा होणार असल्याने एखादा प्रशिक्षणार्थी वर्गात हजर नसल्यास तो प्रशिक्षणात अनुत्तीर्ण होणार आहे. विशेष म्हणजे या परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. प्रशिक्षण घेऊनदेखील शिक्षक अपात्र ठरणार आहेत. दौंड तालुक्यात रयत शिक्षण संस्थेचे नागेश्वर विद्यालय, पाटस या ठिकाणी दोन वर्ग सुरू असून ६० + ३४ शिक्षक या प्रशिक्षणासाठी उपस्थित आहेत. या प्रशिक्षणासाठी दत्तात्रय कुदळे, शकील पठाण, प्रकाश भगत, सुनिल माने, लालासाहेब साळवे, मोहन सरतापे बाबासाहेब ( मुख्या. स्वामी चिंचोली हायस्कूल ) , रामचंद्र नातू ( मुख्या.आदर्श विद्या. वडगाव बांडे ) हे सुलभक म्हणून कामकाज पहाणार आहेत. या प्रशिक्षणाचे समन्वयक म्हणून संभाजी कुंभार, रत्नाकर अणुभास्कर हे असणार आहेत. ज्ञानेश्वर माळी हे टेक्नीकल कामकाज करणार आहेत. या प्रशिक्षण वर्गास आज दौंडचे गटशिक्षणाधिकारी संजय महाजन व खुटबाव/ सोनवडी केंद्राचे केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांनी भेट दिली. विद्यालयाचे मुख्याध्यापक खारतोडे सर यांनी सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

# रेशीमबंध म्हणजे आत्मकथनात्मक आनंदाचा पेटारा- प्रा. तुकाराम पाटील

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

रेशीमबंध म्हणजे आत्मकथनात्मक आनंदाचा पेटारा होय, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक प्रा. तुकाराम पाटील यांनी पेठ क्रमांक २७, निगडी प्राधिकरणातील दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्थेतील ग्रंथदालनात सोमवारी ता. ०२ जून २०२५ रोजी काढले. ज्येष्ठ लेखिका प्रज्ञा घोडके लिखित रेशीमबंध या लघुकथासंग्रहाचे प्रकाशन करताना प्रा. पाटील बोलत होते. माजी उपमहापौर शैलजा मोरे, ज्येष्ठ लेखिका रजनी अहेरराव, डॉ. मानसी हराळे, सामाजिक कार्यकर्त्या राधिका बोर्लीकर, सुहास पोफळे, चंद्रकांत शेडगे, दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष प्रदीप पवार, मिलिंद कुलकर्णी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. पाटील पुढे म्हणाले, प्रज्ञा घोडके यांचे अनुभवविश्व विशाल आहे. गणगोत, आप्तेष्ट यांनी ते भरलेले आहे. त्यांच्याशी असलेल्या सुखदुःख, कृतज्ञता, सेवाभाव या भावभावनांचे दर्शन वाचकाला त्यांच्या लघुकथांच्या माध्यमातून नकळतपणे होते!

शैलजा मोरे यांनी, स्त्रियांनी आपले अनुभव लेखनातून मांडले पाहिजे; कारण त्यातून समाजाला दिशादर्शन होते! असे मत व्यक्त केले. रजनी अहेरराव यांनी, मन हे सुखदुःखाच्या पलीकडे गेले की, एक निर्मळ शुद्ध स्वरूप त्याला प्राप्त होते. रेशीमबंधमधील लघुकथा हे अशाच निर्मळ चिंतनाचे अक्षररूप आहे! असे विचार व्यक्त केले. लेखिका प्रज्ञा घोडके यांनी, आजपर्यंत मी कविता आणि ललितलेखन विपुल प्रमाणात केले असले तरी रेशीमबंध हा माझा पहिलाच लघुकथासंग्रह आहे. माझे आईवडील शिक्षक असल्याने मी अनेक गावं पाहिली तसेच अनेक माणसं मनात घर करून राहिली आहेत. त्यातील व्यामिश्र अनुभवांचे संचित या लघुकथांमध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे! अशा भावना व्यक्त केल्या. राज अहेरराव यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले.

